**"फेब्रुवारी २०१८" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक १ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये भाप्रसे (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) च्या दुसऱ्या परंतुकानुसार Apex Scale (Level १७ in the Pay Matrix या संवर्गात एक पद तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १ फेब्रुवारी ते ३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत निर्माण करण्यास केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या महाराष्ट्रातील भाप्रसे संवर्ग संख्याबळ आढाव्याच्या अधीन राहून मंजुरी देण्यात आली आहे.

- दिनांक २ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये महापार प्रणालीतील e-sign सुविधेमधील काही तांत्रिक अडचणीमुळे सन २०१६-१७ या प्रतिवेदन वर्षासाठी गट-अ संवर्गातील निवडक अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्यासाठी निश्चित केलेली दिनांक ३१ जानेवारी २०१८ ची मुदत आता दिनांक १६ फेब्रुवारी २०१८ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

- शासन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या परिविक्षाधीन कालावधीबाबत दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये दिनांक २९ फेब्रुवारी २०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-१.७(ब) मधील तरतूद रद्द करण्यात आली आहे. तसेच परिच्छेद-१.१० येथील "परिविक्षाधीन कालावधीतच भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहिल" त्या ऐवजी "परिविक्षाधीन अधिकारी / कर्मचारी यांनी मराठी / हिंदी भाषा परीक्षा ही त्या त्या परीक्षेसंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गिमित केलेले नियम / आदेशानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील." अशी सुधारणा करण्यात आली आहे.

- दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल "महापार" या संगणक प्रणालीत नोंदविण्याबाबत आणि राज्य शासकीय सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांचे "कार्यमुल्यमापन अहवाल" लिहिण्यासाठी नमुना निश्चित करण्यात आला आहे.

- दिनांक ८ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार केंद्र शासनाने अपंगाच्या पदनिश्चितीबाबत प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार सामान्य प्रशासन विभाग (उपाहारगृहे) यांच्या आस्थापनेवरील गट-ड मधील पदावर शारीरिकदृष्टया नि:समर्थ असलेल्या व्यक्तींसाठी सुयोग्य पदे निश्चित करण्यात आली आहेत.
- दिनांक ९ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार / कंत्राटी पद्धतीने निर्माण केलेल्या पदांवरील नेमणुकीच्या अटी-शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. तसेच कर्मचाऱ्यासोबत करावयाच्या करारनाम्याचा नमुना विहित करण्यात आला आहे. तसेच सदर पदावर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यात येऊ नये असाही निर्णय घेण्यात आला आहे.

- दिनांक १२ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालय मुख्य इमारतीतील उपाहारगृहाच्या नुतनीकरण करण्याच्या रु.९०.४५ लाख इतक्या रकमेच्या कामास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

- दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये Indian Administrative Service – Reviewing the records Constitution of Revised Review Committee स्थापन केली आहे.

- दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये गट-क व गट-ड संवर्गातील एका वर्षात भरण्यास मान्यता असलेल्या रिक्त पदांच्या २०% पदे ही अनुंकपा नियुक्तीने भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच ही २०% मर्यादा दिनांक १ जानेवारी २०१७ पासून ते पदभरतीवरील निर्बंध असेपर्यंत लागू राहिल.

- दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-५ मधील शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीमध्ये दिनांक १६ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे.

- दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवरील "अवर सचिव (विधि)" संवर्गातील १ पद "उपसचिव (विधि)" संवर्गात दिनांक ९ जानेवारी २०१८ पासून श्रेणीवर्धित करण्यात आले आहे. या श्रेणीवर्धित पदावर श्रीमती सीमा कृष्णदास परमार यांना पदोन्नतीने रुजू करुन घेऊन, त्या मुख्य सचिव कार्यालयात कार्यरत असेपर्यंत हे पद श्रेणीवर्धित राहिल. तद्नंतर ते श्रेणी अवनत होईल.

- दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये गट-अ आणि गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांचे दिनांक १ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या नमुन्यामध्ये सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या वर्षाचे प्रतिवेदित व पुनर्विलोकित केलेले कार्यमुल्यमापन अहवाल पदोन्नती व अन्य सेवाविषयक बाबींसाठी ग्राह्य धरण्याबाबत खुलासा करण्यात आला आहे.

### (ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल</u>

- भारतीय प्रशासन सेवेतील २१ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- कक्ष अधिकारी संवर्गातील १० व वरिष्ठ स्वीय संवर्गातील १ अशा ११ अधिकारी / कर्मचारी यांची बदली करण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- ३ कक्ष अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

### <u>(ग) पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>

- सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील ६५ कर्मचाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे.
- निवडश्रेणी लघुलेखक संवर्गातील ५ कर्मचाऱ्यांना वरिष्ठ स्वीय सहायक संवर्गाती पदोन्नती देण्यात आली आहे.
- उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील १ कर्मचाऱ्याला निवडश्रेणी लघुलेखक संवर्गात प्रपत्र बढती देण्यात आली आहे.

### (घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>

- सहसचिव, उपसचिव संवर्गातील प्रत्येकी एका अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- १ उपसचिव, १ कक्ष अधिकारी व २ उच्चश्रेणी लघुलेखक अशा ४ अधिकारी / कर्मऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

### (च) <u>प्रशिक्षण</u>

- दिनांक १ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखकाचे सन २०१८ मधील सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण वर्ग दिनांक ५ ते २८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत परिषद सभागृह, सहावा मजला, मंत्रालय, मुंबई येथे सकाळी १० ते १२.१० या वेळेत आयोजित करण्यात येत आहे.

### (छ) <u>सेवाप्रवेश नियम</u>

- दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ च्या शासन अधिसूचनेन्वये बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक, गट-क (सेवाप्रवेश) नियम २०१८ प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**(ज) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक १२ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन १९८६ ते २००० या कालावधीतील प्रत्येक वर्षीच्या दिनांक १ जानेवारी रोजीच्या तात्पुरत्या ज्येष्ठतासूच्या हरकती / सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.
- दिनांक २६ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१७ रोजी स्थिती दर्शविणारी अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील वरिष्ठ स्वीय सहायकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक १ जानेवारी २०१८ रोजीची तात्पुरती अतिरिक्त ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

***********